पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय

## कार्यपत्रिका क्र. २

## सभावृत्तांत

दिनांक : १२/०२/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०१४ ची मासिक सभा बुधवार दिनांक १२/०२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करण्यात आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.जावेद रमजान शेख - सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा.भारती फरांदे
४. मा.आर.एस.कुमार
५. मा.पांढरकर निलेश शंकरराव
६. मा.राजू मिसाळ
७. मा.नंदा विकास ताकवणे
८. मा.नेटके सुमन राजेंद्र
९. मा.तरस बाळासाहेब जयवंत
१०. मा.प्रसाद शेट्टी
११. मा.अविनाश (दादा) टेकवडे
१२. मा.सौ. साळुंके सविता सुरेश

याशिवाय मा.श्रीम. रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी, मा.श्री.के.डी. दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री. सुनिल वाघुंडे, उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री. विनोदकुमार कुरुप, कनिष्ठअभियंता(विद्युत), मा.श्री. वहीकर कनिष्ठअभियंता(वाहतुक सेल) इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

अ) दिनांक ११/१२/२२०१३ रोजी आणि दिनांक २४/१२/२०१३ रोजी तहकुब करणेत आलेल्या व दिनांक ०८/०१/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे डिसेंबरचे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ११) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०८/०१/ २०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे जानेवारी २०१४ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक १२) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

| | |
|---|---|
| विषय क्र. ३ | मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव<br>जेष्ठ नागरीकांसाठी विनामुल्य विरंगळा केंद्र सुरु करणेबाबत. |
| विषय क्र. ४ | मा. शरद उर्फ राजू मिसाळ यांचा प्रस्ताव<br>रस्त्याचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र. ५ | मा. शरद उर्फ राजू मिसाळ यांचा प्रस्ताव<br>चौकास नाव देणेबाबत. |
| विषय क्र. ६ | मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव<br>सांस्कृतिक भवनातील हॉलचे नामकरण करणेबाबत.<br>. |
| विषय क्र. ७ | मा. जावेद शेख यांचा प्रस्ताव<br>पाणीदर आकारणीबाबत.<br>. |
| विषय क्र. ८ | मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव<br>आर्थिक वर्ष संपलेशिवाय कर्मचाऱ्यांच्या बदल्या न करणेबाबत.<br>. |
| विषय क्र. ९ | मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव<br>मनपा मार्फत बसविलेल्या पाणीमिटर बाबत.<br>. |
| विषय क्र. १० | मा. मंगलताई कदम यांचा प्रस्ताव<br>संडास मुताऱ्या दुरुस्तीचे कामामधून क्रिडांगण परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणेबाबत. |
| विषय क्र. ११ | कार्यकारी अभियंता स्थापत्य, अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक अप्र/स्था/काअ/१०४/२०१४ दि. १२/०२/२०१४.<br>तरतुद वर्ग करणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १२/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.वैशाली काळभोर | अनुमोदक | : मा. अविनाश टेकवडे |

संदर्भ: मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.२६ काळभोरनगर येथील स.नं. १३५ येथे नव्याने विकसीत करण्यात आलेल्या सांस्कृतीक भवनास "कै.नारायणशेठ विष्णू काळभोर सांस्कृतीक भवन" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १२/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. अविनाश टेकवडे | अनुमोदक | : मा. वैशाली काळभोर |

संदर्भ: मा. अविनाश टेकवडे यांचा प्रस्ताव

मोहननगर प्रभाग क्र.२६ येथील महानगरपालिकचे सांस्कृतीक भवनाचे काम पूर्ण झालेले असून या भवनास मा.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे नाव देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

खालीलप्रमाणो सूचना मांडणेत आली

सुचक : मा. राजू मिसाळ अनुमोदक : मा. आर.एस.कुमार

क्षेत्रीय कार्यलयातील अधिकारी मुख्यालयात होणाऱ्या अंदाजपत्र विषयीच्या बैठकीस गेलेले असून क्षेत्रीय स्तरावरील कामकाजाचा आढावा घेणेसाठी सभागृहात अधिकारी नसलेने सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

सभापती : प्रभाग समिती सभा मंगळवार दिनांक १८/०२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजे पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

सही/-
(श्री.जावेद शेख)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय

**कार्यपत्रिका क्र. २**

**सभावृत्तांत**

(दि. १२/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

दिनांक : १८/०२/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची बुधवार दिनांक १२/०२/२०१४ रोजी तहकुब करणेत आलेली माहे फेब्रुवारी २०१४ ची मासिक सभा मंगळवार दिनांक १८/०२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे घेण्यात आली. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.जावेद रमजान शेख अध्यक्ष
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा.भारती फरांदे
४. मा.आर.एस.कुमार
५. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
६. मा.पांढरकर निलेश शंकरराव
७. मा.नेटके सुमन राजेंद्र
८. मा.तरस बाळासाहेब जयवंत
९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१०. मा.अविनाश (दादा) टेकवडे
११. मा.सौ.काळभोर वैशाली जालिंदर

याशिवाय मा.श्री.प्रशांत खांडकेकर - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.रामदास तांबे-कार्यकरी अभियंता (स्थापत्य), मा.श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी, मा.श्री.अनिल शिंदे, मा.श्री.सुलिन वाघुंडे, मा.श्री.वैभव पुसाळकर - उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री. आबासाहेब ढवळे – उपअभियंता (जलनि:सारण), मा.श्री.पी.जी.जाधव -लेखाधिकारी, मा.श्री.शिवाजी माशाळे - सहा.मंडलाधिकारी (तळवडे करसंगलन) मा.श्री.चौधरी - सहा.मंडलाधिकारी (निगडी करसंगलन)मा.श्री. विजयकुमार कुरुप - कनिष्ठ अभियंता (विद्युत), मा.श्री. राजेंद्र मोरानकर - कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा मुख्यालय), मा.श्री.ए.एस.कुलकर्णी - कनिष्ठ अभियंता (जलनि:सारण), मा.श्री.एम.आय. खोंद्रे -कनिष्ठ अभियंता (स्थापत्य फ), मा.श्री.वहीकर- कनिष्ठ अभियंता (वाहतुक कक्ष), मा.श्री.सी.आर.गुंडाळ - कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा), इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. सविता साळुंकें |

संदर्भः मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण या ठिकाणी असणाऱ्या कै.पांडूरंगबुवा काळभोर सभागृहाचे शेजारील हॉल मध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी विनामुल्य विरंगुळा केंद्र सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. राजू मिसाळ | अनुमोदक | : मा. सौ.नंदा ताकवणे |

संदर्भः मा. राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १७ मधील घर क्रमांक १२६ ते घर क्रमांक १०८, जनता वसाहत, सेक्टर २७ अ प्राधिकरण ते शरयुनगर घर क्रमांक १२ ते २० भूकृपा सोसायटी या समांतर रस्त्यास "कै.प्रितम शिरगावकर मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. राजू मिसाळ | अनुमोदक | : मा. सौ.नंदा ताकवणे |

संदर्भः मा. राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १७ मधील सी.एम.एस. शाळेकडून म्हाळसाकांतकडे जाणा-या सेक्टर २८, प्राधिकरण रस्त्यामधील चौकास "साई चौक" असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ७ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. वैशाली काळभोर | अनुमोदक | : मा. अविनाश टेकवडे |

संदर्भ: मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.२६ काळभोरनगर मधील मोहननगर येथे नव्याने विकसित केलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ सांस्कृतीक भवनामधील हॉलचे "कै.नारायणशेठ विष्णू काळभोर हॉल" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ८ | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. जावेद शेख यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अप्पूघर शेजारील समर्थनगरी अशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील नागरीक पालिका हद्दीबाहेर असले तरी महापालिकेने त्यांच्या पाण्याची सोय केलेली आहे. पण त्याचा दर १००० लिटरला ३५/-रु. असा आहे. परंतु सिध्दीविनायक नगरी हा भाग सुध्दा मनपा हद्दीबाहेर आहे पण तेथील पाण्याचा दर १००० लिटरला २.५० रु. महापालिकेच्या अटी-शर्ती नुसार आहे. याबाबत मा.विधी समिती ठराव क्र.९३४ दिनांक ०३/०४/२००६ अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस केलेली असून मा.महापालिका ठराव क्रमांक ५०८ दिनांक २४/०४/२००६ अन्वये सिध्दीविनायक व श्रीनगरी येथील नागरीकांना मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तरी अप्पूघर शेजारील समर्थनगरी आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील रहिवाशांना सिध्दीविनायक व श्रीनगरी येथील मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.विधीसमीती मार्फत मा.महापालिका सभेपुढे पाठविणेस शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ९ | विषय क्रमांक | : ८ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : प्रशासन |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. राजू मिसाळ |

संदर्भ: मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये जे अधिकारी/ कर्मचारी सध्या ज्या प्रभागात कार्यरत आहेत त्यांच्या आर्थिक वर्ष संपलेशिवाय इतरत्र बदल्या करण्यात येऊ नयेत. सदरचे ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मुख्यालयास कळविण्यात यावे. ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १० | विषय क्रमांक | : ९ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : पाणीपुरवठा |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. बाळासाहेब तरस |

संदर्भ: मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव

अ प्रभाग क्षेत्रात महानगरपालिके मार्फत बसविणेत आलेले पाणीमिटर खराब झालेनंतर ते महापालिकेमार्फतच बदलून द्यावेत व त्यासाठी नागरीकांकडून पाणीमिटरचे पैसे घेण्यात येऊ नयेत. सदरची बाब ही धोरणात्मक असलेने सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी पाणीपुरवठा विभागाकडे पाठविणेत यावा. यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ११ | विषय क्रमांक | : १० |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. भारती फरांदे | अनुमोदक | : मा. वैशाली काळभोर |

संदर्भ: मा. मंगलाताई कदम यांचे दिनांक १२/०२/२०१४ रोजीचे पत्र

अ प्रभाग समिती ठराव क्रमांक ९३ दिनांक ३०/०४/२०१३ अन्वये प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील संडास व मुता-यांची दुरूस्ती करणेच्या कामास मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरचे कामाची निविदा काढण्यात येवून कामाचे आदेश देण्यात आलेले असून काम चालू करण्यात आलेले आहे. सदरचे कामामधून प्रभाग क्र. ९ संभाजीनगर मधील साईउद्यान परिसर व कै.सदाशिव बहिरवाडे किंडागणच्या परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२ | विषय क्रमांक | : ११ |
| दिनांक | : १८/०२/२०१४ | विभाग | : स्थापत्य/ लेखा |
| सुचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. वैशाली काळभोर |

संदर्भ: कार्यकारी अभियंता, स्थापत्य अ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र क्रमांक अप्र/स्था/काअ/१०४/२०१४ दि. १२/०२/२०१४.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षासाठी स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. १,८०,००,०००/- इतकी तरतुद करणेत येऊन सुधारीत र.रु. १,७५,००,०००/- तरतुद करणेत आली होती. स्थापत्याचे माहे – फेब्रुवारी २०१४ महिन्याचे वेतन र.रु. १३,०२,२९८/- असुन या बिलासह एकुण खर्च र.रु. १,७८,७७,५३९/- इतका होत आहे. स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.सय्यद आय.वाय. हे सेवानिवृत्त झालेने त्यांचे रजा रोखीकरणाचे बील अ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागामध्ये खर्ची पडलेने स्थापत्य विभागाचे माहे – फेब्रुवारी २०१४ चे मासिक वेतनाकरीता र.रु. ४,००,०००/- कमी पडत आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०३ नुसार मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक लेखा/अप/२७७८/०८ दिनांक ०२/१२/२००८ अन्वये प्रभाग समितीला दिलेल्या अधिकारानुसार अ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रशासन विभागाकडील "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षातून र.रु. ४,००,०००/- (अक्षरी र.रु. चार लाख फक्त) स्थापत्य विभागाकडील "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(श्री.जावेद शेख)
सभापती
अ प्रभाग समिती

अप्र/११/ कावि/ १०० /२०१४
दिनांक ०७ /०३/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ क्षेत्रीय कार्यालय

प्रत- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.